# नारपोली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २३२ /२०२५ दि. १० /१०/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी**, **नारपोली** वाहतूक उप विभागाच्या हद्दीत टाटा प्रोजेक्ट लिमीटेड यांचेकडुन अंजुर चौक ते अंजुर फाटा दरम्यान रेल्वेच्या अंडरपासचे बाजुला रेल्वे लाईन नं.३ व ४ चे लोखंडी गर्डर टाकण्याचे काम दिनांक १०/१०/२०२५ रोजी रात्रौ २३:०० वा. पासुन ते दिनांक ११/१०/२०२५ रोजी सकाळी ०४:०० वा. पावेतो पर्यंत करण्यात येणार आहे. सदर काम करतेवेळी अंजुर चौक ते अंजुर फाटा अशा दोन्ही वाहीनीवरील वाहतूक पुर्णपणे बंद करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | १) नवी मुंबई कडुन मुंब्रा माणकोली मार्गे गुजरातकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना कळवा वाहतूक उप विभागाच्या हद्दीत **'गॅमन जंक्शन'** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने गॅमन जंक्शन – खारेगांव टोलनाका – कापुरबावडी सर्कल येथुन घोडबंदर मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | २) मुंबई कडुन माजीवाडा वाय जंक्शन माणकोली मार्गे गुजरातकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना कापुरबावडी वाहतूक उप विभागाच्या हद्दीत **'माजीवाडा वाय जंक्शन'** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने कापुरबावडी वाहतूक उप विभागाच्या हद्दीत माजीवाडा वाय जंक्शन येथुन डाव्या बाजुने वळण घेवुन कासारवडवली घोडबंदर रोडने गुजरातकडे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ३) मुंबई व नवी मुंबई कडुन बाळकुम नाका, अंजुर फाटा मार्गे गुजरात/भिवंडीकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना कापुरबावडी वाहतूक उप विभागाच्या हद्दीत **'बाळकुम नाका'** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | गुजरातकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने बाळकुम नाका येथे युटर्न घेवुन कापुरबावडी सर्कल मार्गे घोडबंदर रोडने जातील व भिवंडी कडे जाणारी सर्व प्रकारची वाहने बाळकुम नाका येथे युटर्न घेवुन माजीवाडा जंक्शन मार्गे भिवंडीकडे जातील. |
| **प्रवेश बंद –** | ४) गुजरात कडुन चिंचोटी नाका मार्गे नारपोली वाहतूक उप विभागाच्या अंजुर फाटा मार्गे नाशिक/मुंबई, नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना नारपोली वाहतूक उप विभागाच्या हद्दीत **'७२ गाळा'** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने चिंचोटी नाका – गायमुख – फाऊंटन हॉटेल – घोडबंदर रोड मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ५) भिवंडी वाहतूक उप विभागाच्या हद्दीतुन नारपोली वाहतूक उप विभागाच्या हद्दीतील अंजुर फाटा मार्गे मुंबई व गुजरातकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना भिवंडी वाहतूक उप विभागाच्या हद्दीत **'कल्याण नाका'** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने कल्याण नाका मार्गे – अशोक नगर – भादवड नाका – रांजनोली नाका – मुंबई नाशिक हायवेने माजीवाडा जंक्शन येथुन इच्छित स्थळी जातील. |

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | ६) नाशिक कडुन गुजरातकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना कोनगाव वाहतूक उप विभागाच्या हद्दीत **'रांजनोली नाका'** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने रांजनोली नाका येथे वळण घेवुन वडपे नाका – भिवंडी – वाडा मार्गे इच्छित स्थळी जातील. |

**सदर अधिसूचना दि.१०/१०/२०२५ रोजी रात्रौ २३:०० वा. ते दि. ११/१०/२०२५ रोजी सकाळी ०४:०० वा. पावेतो अंमलात राहील.**

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण.
मा. आयुक्त, भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिका, भिवंडी/बृहन्मुंबई
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२/वि.शा.ठाणे.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, भिवंडी
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी/ठाणे.

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, भिवंडी व पो.निरी. भिवंडी, नारपोली, कोनगांव वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.